# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२

तार - EDUTECH E-mail :- desk 6@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


क्रमांक :- ६/लेखाशाखा/पीएलए/२०१५/ 278

दिनांक :- - 4 NOV 2015

प्रति,

सहसंचालक

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद/नागपूर / अमरावती

विषय :- एनईएफटीव्दारे रक्कम अदा करण्याबाबत...

वरील विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित संस्थांना या संचालनालयाकडून निर्गमित करण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशानुसार वेळोवेळी एनईएफटी व्दारे रक्कम अदा करण्यात येते. करिता संबंधित संस्थांकडून डिसेंबर २०१४ पासून शासन निर्णय दिनांक १८ एप्रिल २०११ मधील तरतूदीनुसार बँक तपशील घेण्यात आलेला आहे. तथापि यापूर्वी या संचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे डिसेंबर २०१४ पूर्वी संबंधित संस्थांना एनईएफटीव्दारे रक्कम अदा करण्यात आलेल्या आहेत.

परंतू तरी देखील एनईएफटीव्दारे संस्थांना रक्कमा अदा करतांना खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

१. संस्थांनी डिसेंबर २०१४ पूर्वी दिलेला बँक तपशील व डिसेंबर २०१४ नंतर सादर केलेला बँक तपशील यामध्ये बरेचदा तफावत आढळून येते.
२. बँक तपशील मध्ये नमूद बँक खाते क्रमांक हा संस्थेचा नसून एखाद्या कर्मचाऱ्याचे / अधिकाऱ्याचे / मॅनेजमेंट वरील एखाद्या सदस्याचे देखील देण्यात आल्याचे दिसून येते. सदर बाब ही गंभीर स्वरुपाची आहे.

उपरोक्त त्रुटी विचारात घेऊन आपणांस कळविण्यात येते की, आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/ अनुदानित/ विनाअनुदानित संस्थांनी दिलेले बँक तपशील याची प्रत्यक्ष छाननी / परिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल या संचालनालयास १ महिन्याच्या आत सादर करावा.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 8441
दिनांक - 9 NOV 2015

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक

तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई

पृ. क्र.तंशिसं/विकाना/एनईएफटी/ईबीसी/२०१५/ 3599

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर

दिनांक : 30 NOV 2015

प्रति,

प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर तसेच पदवीका संस्था

नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यांत येते की, पत्रात नमुद केल्याप्रमाणे सदरहू माहिती या कार्यालयास त्वरीत सादर करण्यांत यावी. जेणेकरुन एनईएफटीची रक्कम अदा केल्याची माहिती संचालनालयास सादर करणे सोईचे होईल.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर